


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । बुधवार, दि. २७ मार्च २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १७७ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२


**आजचा सामना**

MUMBAI INDIANS Vs SUNRISERS

मुंबई इंडियन्स वि.सनरायजर्स हैद्राबाद

वेळ : ७.३० वा. स्थळ : हैद्राबाद

# माढा लढायचाच 'शिवरत्न'वर पण! अकलूज टु बारामती व्हाया फलटण!!

✔ सोलापूर/खास प्रतिनिधी

'शिवरत्न'वर काल मंगळवारी झालेल्या मोहिते पाटील परिवारातील सदस्यांच्या बैठकीत कोणत्याही परिस्थितीत माढा लढवायचाच या निर्णयावर एकमत झाल्याची खात्रीशीर माहिती समोर आली आहे. ज्येष्ठ नेते रामराजे निंबाळकर यांच्या मध्यस्थीने धैर्यशील मोहिते पाटील हे शरद पवार यांची भेट घेण्यासाठी बारामतीला जाणार असल्याचेही वृत्त आहे. दरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रामराजे निंबाळकर यांच्यासह माढा मतदारसंघातील आमदारांची तातडीची बैठक आज मुंबईत बोलावली आहे. त्यामुळे रामराजे नेमका काय निर्णय घेणार याकडे माढा मतदारसंघासह संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

### माढ्यातून लढण्यावर परिवाराचं 'एकमत'

आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील वगळता या परिवारातील सर्व सदस्यांनी काल दुपारी 'शिवरत्न' बंगल्यावर दीर्घवेळी बैंठक झाली. या बैंठकीत माढ्यातून खासदारकी लढण्याबद्दल सर्व शक्यतांची पडताळणी झाली. बराच वेळ चर्चेचा किस पडल्यानंतर माढ्यातून लढण्यावर सर्व परिवाराचं एकमत झाल्याची खात्रीशीर माहिती समोर आली आहे.



खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांचं काम करायची की माढ्याच्या आखाड्यात उतरून मोहिते-पाटील ब्रँडचा 'करिष्मा' दाखवून द्यायचा, याचा निर्णय अकलूजकर मोहिते-पाटील यांच्याकडून अद्याप गुलदस्त्यात राहात असला तरी त्यांच्या हालचाली मात्र सुरूच आहेत. माढ्याचा तिढा सोडविण्यासाठी अजित पवार यांनी आजच पुण्यात बैंठक बोलावली असतानाच, मोहिते पाटील हे ज्येष्ठ नेते रामराजे निंबाळकर यांच्यामार्फत शरद पवार यांच्या भेट जाणार असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली आहे. वास्तविक आज मंगळवारीच मोहिते-पाटील हे रामराजे निंबाळकर यांच्या भेटीला जाणार होते, मात्र, ते पुणे दौऱ्यावर असल्यानं मोहिते-पाटील हे फलटणला गेले नाहीत असे सांगण्यात आले. भाजपाने उमेदवारी नाकारल्यानंतर माढ्यातून लढण्याची झालेली मानसिकता खुद्द मोहिते-पाटील आणि त्यांच्या समर्थकांना शांत बसून देत नसल्याचे दिसत आहे. कारण आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आले तरी भाजपा उमेदवाराचे काम करण्याची तयारी होत नाही. उलट रामराजे निंबाळकर यांच्यामार्फत मोहिते-पाटील हे ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेण्याच्या मानसिकतेत आहेत. या सगळ्या पार्श्वभूमीवर, आजचा दिवस महत्वाचा असू शकतो. कारण अजित पवार यांच्या सांगण्यानुसार, रामराजे निंबाळकर हे काय भूमिका घेतात, त्यांच्या भूमिकेवरुन मोहिते-पाटील यांची खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्याबाबतीत भूमिका ठरू शकते. शिवाय मोहिते-पाटील हे रामराजे निंबाळकर यांना सुरवातीला भेटून पुन्हा त्यांच्या मार्फत शरद पवार यांच्या भेटीला जातात का? संबंधितांची भेट होणार का? आज दिवसभरात सगळं पाहणं महत्वाचं आणि तितकचं औत्सुक्याचं आहे.

### दुखऱ्या जखमेवर मीठ

उमेदवारीवरुन मोहिते-पाटील यांची नाराजी आहे, ही नाराजी दुर करण्याचा प्रयत्न तर भाजपानं केला नाहीच नाही. त्यातच आता त्यांना विश्वासात न घेता त्यांच्या बालेकिल्ल्यात प्रचाराचा नारळ फोडण्याची तयारी सुरु केली आहे.

## भाजपाचे एक पाऊल पुढेच...

### मोहिते-पाटील यांच्या बालेकिल्ल्यातच प्रचाराचा नारळ

**रामराजेंच्या वाड्यावर विजयदादा**

कोणत्याही परिस्थितीत पुतण्या धैर्यशीलभैया यांना खासदार करायचं असा इरादा पक्का केलेल्या ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हालचाली सुरुच आहेत. याच पार्श्वभूमीवर, आज मंगळवारी विजयसिंह मोहिते-पाटील हे फलटण येथे रामराजे निंबाळकर यांच्या निवासस्थानी गेले. तिथे संजीवराजे निंबाळकर यांच्या उपस्थितीत समविचारी नेत्यांची बैंठक घेतली.

रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना उमेदवारी दिल्याने मोहिते-पाटील परिवार प्रचंड नाराज झाला. सोलापूरसह सातारा जिल्ह्यातील समर्थकांना बोलावून 'शिवरत्न'वर बैठक घेतली. माढा मतदार संघात मोहिते-पाटील परिवारातील सदस्यांनी दौरे काढले, आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची स्वत:हून भेट घेत समर्थकांच्या भावनेची कल्पना दिली. मात्र, भाजपानं उमदेवारीबाबत ठाम राहण्याची भूमिका घेतली. फडणवीस हे कुलदैवत निरा नरसिंहपूर येथे दर्शन घेऊन मोहिते-पाटील यांच्या बालेकिल्ल्यात माळशिरस येथे नाईक-निंबाळकरांच्या प्रचाराचा नारळ १२ एप्रिलला सहभागी होतील. अजित पवार, एकनाथ शिंदे, महायुतीतील पक्षांच्या पदाधिकाऱ्यांना पाचरण करण्यात येणार आहे.



# पतंगाची एंट्री; मोहरा कोण?



अजित उंब्रजकर
सोलापूर

सोलापूरसाठी प्रमुख भाजप आणि काँग्रेसचे उमेदवार जाहीर झाले आहेत. आमदार राम सातपुते आणि आमदार प्रणिती शिंदे यांच्यात रंगतदार लढत होणार आहे. दरम्यान याच वळणावर आता एमआयएम पक्षाची भूमिका काय असणार? याबाबत एक वेगळीच उत्सुकता सोलापूर लोकसभेच्या पटलावर लागणार आहे. एमआयएम पक्षानेही आपला उमेदवार इथं देण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. आमदार शिंदे आणि सातपुते यांना टक्कर देणारा एमआयएमचा मोहरा कोण असणार? याची चर्चा सुरु झाली. या पक्षानं उमेदवार दिल्यास ही लढत रंगतदार आणि तगडी होणार आहे. एमआयएमचा फटका पुन्हा काँग्रेसला बसणार का, याचीही चर्चा सुरू झाली आहे.




पक्षाचे शहराध्यक्ष फारूक शाब्दी यांनी तीन नावे वरिष्ठांकडे कळवली आहेत. ती नावे कोणती आहेत. हे अद्यापही गुलदस्तात आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत एमआयएम आणि वंचितची आघाडी झाली होती. या आघाडीच्या माध्यमातून सोलापुरातून डॉ. प्रकाश आंबेडकर यांनी निवडणूक लढवली होती. त्यांना सुमारे पावणेदोन लाख मते मिळाली होती. यामध्ये एमआयएमच्या मतांचाही मोठा वाटा होता. याचा फटका काँग्रेसचे उमेदवार सुशीलकुमार शिंदे यांना बसला होता.

शहर मध्यमध्ये सध्या आमदार प्रणिती शिंदे नेतृत्व करत आहेत. या मतदारसंघात मुस्लिम समाज मोठ्या प्रमाणात आहे. एमआयएमचा उमेदवार नसला तर मुस्लिम समाजाची मते प्रणिती शिंदे यांना जातील अशी चर्चा आहे. मात्र आता एमआयएम ने उमेदवार उभा करण्याचे नियोजन सुरू केले आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात काँग्रेसच्या मतांमध्ये विभागणी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. याशिवाय २०१४ रोजी झालेल्या विधानसभा निवडणुकीत एमआयएमच्या शहर उत्तर आणि दक्षिण मतदार संघातील उमेदवारांना बारा ते पंधरा हजार पर्यंत मते मिळाली होती. तसेच तौफिक शेख यांना शहर मध्यमधून ३७ हजार मते मिळाली होती. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत शहर मध्य मधून फारूक शाब्दी यांना ३९ हजार मते मिळाली होती. हीच मते लोकसभा निवडणुकीत निर्णायक ठरण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. याशिवाय प्रत्येक मतदारसंघात एमआयएमच्या मतांचे पॉकेट आहे ही मते ही महत्त्वाची ठरू शकतात.

**काँग्रेसला धास्ती :** एमआयएमच्या उमेदवारीबद्दल काँग्रेसला धास्ती वाटू शकते, असे जाणकार सांगू लागलेत. आमदारकीच्या शहर मध्य मतदार संघात अल्पसंख्याक म्हणजेच मुस्लीमांची मते मोठ्या संख्येने आहेत. एमआयएमच्या उमेदवाराची जेव्हा चर्चा नव्हती, तेव्हा अल्पसंख्याकांची मते काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांना मिळणार हे गृहीत धरण्यात आले होते. मात्र, जेव्हा एमआयएमचा उमेदवार निवडणुकीत असणार, ही माहिती पुढे आली तेव्हा काँग्रेसला धास्ती वाटू लागली आहे.

**खदखद कायमच मोहरा बदलला**

# मोहिते-पाटील समर्थकांच्या निशाण्यावर नाईक-निंबाळकर नव्हे आता सातपुते!



**मोहिते-पाटलांच्या बाजूने त्यांचे समर्थक अक्षरश: पेटून उठलेत. 'आमचं ठरलंय' असंच नुसतं नव्हे तर 'आमचं फिक्स असतंय'असा नारा त्यांच्याकडून दिला जातोय. मोहिते-पाटील यांच्या ऐवजी रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना माढ्याची उमदेवारी जाहीर झाल्यापासून तर हे समर्थक फलटणकरांवर जणू तुटून पडताहेत. खासदार नाईक-निंबाळकरांबद्दल प्रचंड खदखद मोहिते-पाटील समर्थकांमध्ये राहिलेली. सोशल मीडियाच्या साइट्सवर समर्थकांकडून संतापाची आग ओकली जात होती. मोहिते-पाटील समर्थकांनी नाईक-निंबाळकरांना 'टार्गेट' केलं होते. मोहिते-पाटील समर्थकांच्या जळी,स्थळी, काष्ठी, पाषाणी फक्त खासदार नाईक-निंबाळकर हेच होते.**

दरम्यान, दोन दिवसांपासून मोहिते-पाटील समर्थकांचा नूर बदल्याचं जाणवत आहे. नाईक-निंबाळकरांना बाजूला करुन आमदार राम सातपुते यांना आता या समर्थकांनी आपल्या दातीखाती धरलंय. सोशल मीडियावर सातपुते यांच्या विरोधातील कंमेट्सचा अक्षरश: पाऊस पाडला जातोय. आग्रही भूमिका घेऊन ज्या सातपुते यांना मोहिते-पाटील समर्थकांनी आमदार म्हणून माळशिरसमधून निवडून आणलं, तेच समर्थक सातपुते यांना सोलापूर लोकसभेची उमेदवारी मिळाल्यापासून विरोधात का जाताहेत? सुरवातीला खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर आणि त्यानंतर आता आमदार राम सातपुते...टार्गेट करणाचं नेमकं लॉजिक तरी काय? नेमकं काय घडतंय... या संदर्भात दैनिक 'सुराज्य'नं खोलवर माहिती घेतली... तेव्हा समोर आलेलं हे सत्य...

**प्रसंग १**

गतवर्षी माढा मतदार संघातील कार्यकर्त्यांचा मिलन मेळावा नातेपुते येथील मधुर मिलन या मंगल कार्यालयात विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी आयोजित केला होता. या कार्यक्रमाला माळशिरस तालुक्याचे आमदार राम सातपुते यांनी उपस्थित राहणे टाळले. त्याच कार्यालयात काही दिवसांपूर्वी राम सातपुते यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. परंतु, त्या वाढदिवसाला विद्यमान खासदार निंबाळकर यांची उपस्थिती नव्हती आणि बॅनरवर त्यांचा फोटोही नव्हता. एवढे उदाहरण पुरेसे आहे खासदार आणि आमदार यांच्यातील असणाऱ्या अंतराचे. खरे तर दोघेही खासदार आणि आमदार जिंकून येण्यात मोहिते-पाटील यांची पुण्याई फळाला आली होती. मोहिते-पाटील कार्यकर्त्यांनी ज्या पद्धतीने या दोन्ही खासदार आणि आमदारांवर प्रेम केले होते. त्याची उतराई होण्यामध्ये थोडीशी कसूर झाली असेच काय ते. काही दिवसातच खासदार निंबाळकर यांनी मोहिते-पाटलांशी फारकत घेतली आणि माढा मतदार संघात मोहिते-पाटलांना वगळून राजकारण करण्यास सुरवात केलेली झाले..इथेच माशी शिंकली आणि मोहिते-पाटील समर्थकांची नाराजी खासदारांनी ओढवून घेतली. प्रत्येक कामावर, वक्तव्यावर आणि राजकीय धोरणावर खासदार नाईक-निंबाळकर ट्रोल होऊ लागलेले. राजकीय चाणक्यपणा वापरून आमदार राम सातपुते मात्र यापासून अलबेल राहिलेले. आमदार सातपुते खासदारांशी थोडेसे अंतर ठेवून तर ङ्गशिवरत्नफ्शी जवळकीता वाढवू लागलेले. अशातच लोकसभेची उमेदवारी भाजपकडून खासदार निंबाळकर यांना दिली गेली आणि अधिकृतरित्या मोहिते-पाटील समर्थकांच्या संतापाचे वाटेकरी खासदार नाईक-निंबाळकर हे झाले. यामध्ये आमदार राम सातपुते यांनी मात्र संयमाची भूमिका ठेवलेली. त्यामुळे मोहिते-पाटील समर्थकांचा राग राम सातपुतेंवर नव्हता.

**प्रसंग २**

परंतु, तीही वेळ आलेलीच. खासदार नाईक-निंबाळकरांना तिकीट जाहीर झाल्यानंतर माळशिरसच्या आमदारांची भेट घेण्यासाठी ते मांडवे येथील त्यांच्या निवासस्थानी गेले. पक्ष शस्तीप्रमाणे आमदार राम सातपुते यांनी भाजपच्या चिन्हावर माढा येथून नरेंद्र मोदीच उभे आहेत, असे समजून विद्यमान खासदारांना निवडून आणण्याची जबाबदारी आपली आहे, तेव्हा सर्व कार्यकर्त्यांनी कामाला लागा असा संदेश दिलेला. झाले..... पुन्हा एकदा मोहिते-पाटील समर्थकांचा उद्रेक झालेला... इकडे पक्षाने तिकीट दिले नाही म्हणून मोहिते-पाटील समर्थक ङ्गशिवरत्नफ्वर जाऊन घोषणाबाजी करत होते, पक्षाविषयी नाराजी व्यक्त करत होते. मात्र आमदार सातपुते हे तेव्हा कुठेही न दिसलेले. त्यांनी पक्षाविषयीच्या निर्णयाबाबत कोणतंही मत व्यक्त न केलेलं. मोहिते-पाटलांना खासदारकीची उमेदवारी मिळावी याबाबत कोठेच वाच्यता न केलेली. किंवा 'शिवरत्न'वर जाऊन मोहिते-पाटील कुटुंबीयांची साधी भेटही न घेतलेली. या सर्वांची परिणिती म्हणजे मोहिते-पाटील समर्थकांची नाराजी सातपुते यांच्यावर आलेली.

**प्रसंग ३**

आदल्या दिवशी 'शिवरत्न'वर कार्यकर्त्यांचा मोठा गलका झालेला आणि दुसऱ्या दिवशी खासदार निंबाळकर यांच्या प्रचाराच्या बैठकीसाठी टेंभुर्णी येथे मोहिते-पाटील यांचे कट्टर राजकीय दुष्मन आमदार संजयमामा शिंदे यांच्या फार्महाऊसवर आमदार सातपुते अवतरलेले. या बैठकीमध्येदेखील सातपुते यांनी विद्यमान खासदारांचा प्रचार करावा याबाबत मत व्यक्त केलंलं...वृत्वाहिन्यांना जोरकस बाईट दिलेल्या...साहजिकच या सर्व कारणांमुळे राम सातपुते यांच्या बद्दल खुद्द मोहिते-पाटील आणि त्यांच्या समर्थकांमध्ये असणाऱ्या आदरावर प्रश्नचिन्ह आले...जे आपल्या वेळेला नाहीत, त्यांना घेऊन काय करायचे? असाच मेसेज मोहिते-पाटील समर्थकांमध्ये फिरला अन् राम सातपुते यांच्याबद्दल कलुषित वातावरणाचे मळभ निर्माण व्हायला लागले.

**प्रसंग ४**

अशातच राम सातपुते यांना सोलापूर मतदार संघातून उमेदवारी जाहीर झाली आणि मोहिते-पाटील समर्थकांचा रोष खासदार निंबाळकर यांच्या वरून थेट राम सातपुते यांच्याकडेच सरकला. सध्या माढा मतदार संघामध्ये माढ्याचं काय होईल? याच्या चर्चेपेक्षा राम सातपुते कसे सोलापुरातून पराभूत होतील याची चर्चा जोरात पाहायला मिळतेय. खरं तर माढा मतदारांचा सोलापूरच्या लोकसभेची अर्थाअर्थी तसा फार काही संबंध नाही, तरी देखील राम सातपुतेंना आवर्जून ट्रोल केलं जातंय. याचं कारण त्यांनी माढा लोकसभेच्या उमेदवाराबाबत घेतलेली भूमिका हेच असल्याचं सांगितलं जातंय.





### खरी गोम तर वेगळीच...

माढा मतदारसंघातील शासकीय कार्यक्रमात खासदार निंबाळकर यांनी वेळापूरच्या उत्तम जानकर यांना जनतेच्या मनातील आमदार अशी उपमा दिली होती. आपल्या पक्षाच्या राम सातपुते या आमदारांपेक्षा त्यांची जवळीकता राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या जानकारांशी जास्त होती. वेळोवेळी ते त्यांचा उल्लेख जनतेचे आमदार असाच करायचे. नाईक-निंबाळकर यांच्या या गोष्टीचा राग आमदार सातपुते यांना आलाच नाही, असे तरी ते वरकरणी दाखवत होते खरे परंतु, आतून सातपुते यांना त्या खुपत होते. काही दिवसांपूर्वी नाईक-निंबाळकरांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर आणि राम सातपुते यांना सोलापुरातून उमेदवारी मिळणार असे निश्चित झाल्यानंतर राम सातपुते माझ्याबरोबर दिल्लीला आले तर मला आनंदच वाटेल, अशी भूमिका नाईक-निंबाळकर यांनी जरी मांडली असली तरी जनतेच्या मनातील आमदाराबाबत खासदार व आमदारांच्या भूमिकेची चर्चा आगामी काळातच कळेल.असो तूर्तास तरी माळशिरस ला येताना आमदार राम सातपुते यांना मोहिते पाटील समर्थकांच्या रोषाला सामोरे मात्र जावे लागणार हे नक्की. माढ्याच्या खासदारकीवरुन माळशिरस तालुक्यात प्रचंड रणकंदन सुरु आहे. मोहिते-पाटील समर्थक आक्रमक होत. सोशल मीडियावर आपली संतापाची आग ओकत आहेत.